वाचले :
१. आदेश क्र.प्रशा/२/कावि/५२१/२०१८ दि.१३/१२/२०१८
२. आदेश क्र.प्रशा/२/कावि/४१/२०२४ दि.०१/०२/२०२४
३. मा.आयुक्त यांचेकडील दि. ०३/०४/२०२४ रोजीचा मान्य प्रस्ताव

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
सामान्य प्रशासन विभाग,
क्र.सा.प्र.वि/२/कावि/२३६/२०२४
दिनांक : ०३/०४/२०२४

विषय – यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय व पदव्युत्तर पदवी संस्था कामकाजाबाबत...

आदेश,

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, प्रशासकीय तसेच रुग्णालयीन कामकाजाचे सोयीचे दृष्टीने डॉ.अभयचंद्र अनंतराम दादेवार, अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांना दिनांक ०१/०२/२०२४ रोजीच्या आदेशान्वये यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय करिता विभागप्रमुख म्हणून घोषित करणेत आलेले आहे.

यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय व पदव्युत्तर पदवी संस्था यांचे रुग्णालयीन व्यवस्थापन, प्रशासकीय कामकाजाच्या जबाबदा-या व वैद्यकीय शिक्षण संस्था (पदव्युत्तर अभ्यासक्रम) शैक्षणिक (*academic*) व प्रशासकीय कामकाजाबाबत योग्य संघटन व समन्वय साधणे आवश्यक आहे. तसेच वैद्यकीय शिक्षण संस्था (पदव्युत्तर अभ्यासक्रम) मान्यतेसंदर्भातील पात्रता निकष यांचा विचार करता अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी व अधिष्ठता यांची कामे व जबाबदा-या योग्यत-हेने सुस्पष्ट करणे आवश्यक आहे.

सबब, मी आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, असे आदेशित करतो की प्रशासकीय तसेच रुग्णालयीन कामकाजाचे सोयीचे दृष्टीने अधिष्ठता यांनी दिनांक १३/१२/२०१८ रोजीच्या आदेशाप्रमाणे कामकाज करावे. तसेच डॉ.अभयचंद्र अनंतराम दादेवार, अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे सुधारीत जबाबदा-या सोपविण्यात येत आहे.

**अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी –**

१. अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाचे त्यांना सोपविलेल्या कामाच्या कार्यकक्षेच्या मर्यादेत विभागप्रमुखांना प्रदान केलेले प्रशासकीय व वित्तीय अधिकारांचा वापर करावा. तसेच त्यांनी वैद्यकीय विभागाकडील मूळ पदाचे कामकाजही करावे.
२. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी, महाराष्ट्र नागरी सेवा नियम व वेळोवेळी शासनाकडून निर्गत होणारी परिपत्रके, शासन निर्णयानुसार आदेशानुसार कामकाज करावे.
३. यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय (अधिष्ठाता यांचेकडील कामकाज वगळून) संबंधीत दैनंदीन प्रशासकीय कामकाजाचे नियोजन,संचालन व व्यवस्थापन करणे.
४. यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय (अधिष्ठाता यांचेकडील कामकाज वगळून) व्यवस्थापनावरील सर्व गट 'ब' ते गट 'ड' संवर्गामध्ये कार्यरत अधिकारी व कर्मचारी वर्गावर तसेच त्यांच्या कामकाजावर संपुर्ण नियंत्रण राहील (आस्थापना, मानधन व बाह्यस्त्रोत)
५. विभागप्रमुखांना प्रदान करण्यात आलेल्या शिस्तभंग विषयक कारवाईचे अधिकार सक्षमपणे वापरावेत.

६. अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांच्याकडे यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयातील खालील विभागांचे संपूर्ण कामकाज व मानवी संसाधनांचे विभागप्रमुख राहतील. तसेच अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांचे खालील कामकाजावर थेट नियंत्रण राहील.

a. *Stores Dept.*
b. *Central Sterile Supply Dept.*
c. *Medical Records Dept.*
d. *Dietetics*
e. *Establishment*
f. *Laundry*
g. *Manifold*
h. *Nursing*
i. *Pharmacy store/pharmacy*
j. *Public Relations Office*
k. *Procurement*
l. *Reception*
m. *Sanitation*
n. *Security /Fire Dept.*
o. *Staff Clinic*
p. *Telephone Exchange*
q. *Transport*
r. *Civil & water supply*
s. *Electrical Dept. & CCTV Sur.*
t. *Biomedical Engineering Dept.*

७. आवश्यकता असल्यास यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाचे विद्यमान कार्यपध्दतीमध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी उपाययोजना करण्यात याव्यात.

८. रुग्णालय व शैक्षणिक संस्थेसंबंधित धोरणात्मक निर्णयांबाबत अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी व अधिष्ठाता यांनी समन्वय व सहमतीने निर्णय घेणे अनिवार्य राहील.

९. रुग्णालयाशी संबंधित सादर होणा-या नस्त्या तसेच धोरणात्मक निर्णय अधिष्ठाता यांचे समन्वय व सहमतीने संबंधित अतिरिक्त आयुक्त यांचे मार्फत मा.आयुक्त यांचेकडे सादर कराव्यात.

**अधिष्ठाता –**

१. यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाचे पदव्युत्तर पदवी संस्थेच्या अनुषंगाने यापुर्वीचे दि १३/१२/२०१८ चे आदेशान्वये नमूद केलेल्या (अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांचेकडील उपरोक्त मुद्दा क्र. ६ येथे नमुद कामकाज वगळून). बाबींशी संबधित जबाबदा-या व कर्तव्ये सुनिश्चित केले प्रमाणे कामकाज करावे.

२. अधिष्ठता यांनी पदव्युत्तर संस्थेशी संबंधित कामकाजाचे कार्यकक्षेच्या मर्यादेत विभागप्रमुखांना प्रदान केलेले प्रशासकीय व वित्तीय अधिकारांचा वापर करावा.

३. यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय पदव्युत्तर संस्थे अंतर्गत सुरु असलेल्या अभ्यासक्रमाच्या अनुषंगाने केंद्र शासन, राज्य शासन, राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग (NMC), भारतीय उपचर्या परिषद (INC)] आणि महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ यांचे नियमावली नुसार व्यवस्थापनाकरीता आवश्यक अध्यापक वर्गाचे कामकाजाचे नियोजन व नियंत्रण करणे.

४. शैक्षणिक अभ्यासक्रम राबविणेच्या दृष्टीने नेमणूक झालेले सर्व अध्यापक व वैद्यकीय अधिकारी यांचे आस्थापना विषयक तसेच त्यांचे वेळापत्रक, परीक्षा, अभ्यासक्रमासाठी आवश्यक पदांची भर्ती प्रक्रिया व विद्यार्थी प्रवेश प्रक्रिया इत्यादी सर्व कामकाज.

५. पदव्युत्तर पदवी संस्था व यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय व्यवस्थापनावरील सर्व गट 'अ' संवर्गातील कार्यरत अध्यापक व वैद्यकीय अधिकारी वर्गापुरते मर्यादीत नियंत्रण व शिस्तभंग विषयक कारवाईचे अधिकार (विभागप्रमुखांना प्रदान केलेले) सक्षमपणे वापरावेत.

६. यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय व पदव्युत्तर पदवी संस्थेशी संबंधित शैक्षणिक व्यवस्थापनावरील सर्व गट 'अ' संवर्गामध्ये कार्यरत वैद्यकीय सेवे संबंधित अधिकारी वर्गावर संपुर्ण नियंत्रण राहील.

७. रुग्णसेवा बिलामध्ये सवलत अथवा माफिचे अधिकार पूर्वीप्रमाणे राहतील.

८. दिव्यांग प्रमाणपत्र वितरीत करण्याचे अधिकारी पूर्वीप्रमाणे राहतील.

९. शैक्षणिक अभ्यासक्रमाशी संबंधित सादर होणा-या नस्त्या तसेच धोरणात्मक निर्णय संबंधित अतिरिक्त आयुक्त यांचे मार्फत मा.आयुक्त यांचेकडे सादर कराव्यात.

१०. आवश्यकता असल्यास पदव्युत्तर पदवी संस्थेच्या विद्यमान कार्यपध्दतीमध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी उपाययोजना करण्यात याव्यात.

११. पदव्युत्तर पदवी संस्था यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय येथील वैद्यकीय (*Clinical)* व शैक्षणिक (*academic*) व्यवस्थापनावरील संबंधित विषयाचे विभागप्रमुख, प्राध्यापक, वैद्यकीय अधिकारी हे अध्यापनशास्त्रीय मार्गदर्शन व रुग्णांच्या उपचारासाठी दुहेरी भूमिका बजावतील त्यानुसार जबाबदा-यांचे वाटप अधिष्ठाता यांनी करावे.

१२. अधिष्ठाता यांनी यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय आणि पदव्युत्तर पदवी संस्था संबंधित सर्व क्रियाकलापांसाठी विविध अर्थसंकल्पीय तरतुदी अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांचेशी समन्वयाने सक्षम प्राधिका-यांच्या मान्यतेने कराव्यात.

१३. रुग्णालय व शैक्षणिक संस्थेसंबंधित धोरणात्मक निर्णयांबाबत अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी व अधिष्ठता यांनी समन्वय व सहमतीने निर्णय घेणे अनिवार्य राहील.

प्रस्तुतच्या अधिकारामध्ये बदल करणे अथवा निरस्त करणे याबाबतचे हक्क मी स्वत:कडे राखून ठेवीत आहे.

प्रस्तुत आदेशाचा अंमल तात्काळ लागू होईल.

(शेखर सिंह)
आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,

प्रति,

सर्व संबंधित अधिकारी

प्रत,१. मा.अतिरिक्त आयुक्त कक्ष २.लेखा विभाग
३.लेखापरिक्षण विभाग, ४. सर्व संबंधित विभाग.